Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

A

Paper-III
GEOGRAPHY

Signature and Name of Invigilator

1. (Signature) .....

(Name) .....

2. (Signature) .....

(Name) .....

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. .....

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

APR - 36317

Time Allowed : 2½ Hours] **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40**

Number of Questions in this Booklet : **75**

Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   Example : where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   उदा. : जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

GEOGRAPHY
Paper III
भूगोल
प्रश्नपत्रिका III

Time Allowed : 2½ Hours] **[Maximum Marks : 150**

Note : This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

सूचना : या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Which of the following is an example of low grade metamorphism ?

   (A) Marble

   (B) Gneiss

   (C) Slate

   (D) Quartzite

2. Which of the following landforms is *not* found in Karstic Landscape ?

   (A) Dolines

   (B) Sinkholes

   (C) Stalactite/Stalagmite

   (D) Stake

1. खालीलपैकी कोणते कमीदर्जाच्या रूपांतरणाचे उदाहरण आहे ?

   (A) संगमरवर

   (B) नीस

   (C) स्लेट

   (D) क्वार्टझाईट

2. खालीलपैकी कोणते भूरूप कार्स्ट स्थलरूपांत आढळत **नाही** ?

   (A) डोलाईन

   (B) विलयन विवर

   (C) लवण स्तंभ

   (D) स्टेक

3. 'Talus' are ..... .

(A) Hills as end product of erosion

(B) Heaps of material at the base of cliffs

(C) Weathering products

(D) Riverine sand dunes

4. Which of the following is *not* a characteristic of humid tropical landscape ?

(A) Deep weathering profile

(B) Intense leaching

(C) Towering Inselberg

(D) Inselberg

5. The concept of morphogenetic region was put forth by ..... .

(A) Peltier

(B) Derbyshire

(C) Budel

(D) Darlymple

3. 'तालुस' म्हणजे ..... .

(A) अपक्षरणाच्या अंतिम उत्पादनाच्या स्वरूपातील टेकड्या

(B) कड्यांच्या पायथ्याकडील पदार्थाचे ढीग

(C) अपक्षयाचे उत्पादन

(D) नदीकाठचे वालुकागिरी

4. खालीलपैकी कोणता दमट उष्णकटिबंधीय भूदृश्याचा गुणधर्म **नाही** ?

(A) खोलवरची अपक्षयाची पार्श्विका

(B) तीव्र निक्षालन

(C) गोपरीय द्वीपगिरी

(D) द्वीपगिरी

5. 'आकारजननीय विभाग' ही संकल्पना ..... याने मांडली.

(A) पेल्शीअर

(B) डर्बीशायर

(C) बुडेल

(D) डार्लिम्पल

6. Which plate is the principal cause for Andes Mountain ?

(A) The Nazca Plate

(B) Juan de Fuca Plate

(C) The N. American Plate

(D) The Caribbean Plate

7. Arrange the following types of riverine load in ascending order in terms of energy expended in the process :

(1) Suspension

(2) Saltation

(3) Bed load

(4) Wash load

Which of the following is the *correct* sequence ?

(A) (4), (1), (2), (3)

(B) (1), (2), (3), (4)

(C) (4), (2), (3), (1)

(D) (3), (2), (4), (1)

6. खालीलपैकी कोणता भूपट्ट अँडीज पर्वताचे निर्मितीचे कारण आहे ?

(A) नाझका भूपट्ट

(B) जुआंडी फुका भूपट्ट

(C) उत्तर अमेरिकन भूपट्ट

(D) कॅरेबियन भूपट्ट

7. खाली दिलेल्या नदीय जलोढांचा, त्यांच्या वहनासाठी खर्च्ची पडणाऱ्या ऊर्जेनुसार चढताक्रम लावा :

(1) निलंबित

(2) उत्प्लवित

(3) तलीय

(4) तरंगता

खालीलपैकी कोणता अनुक्रम बरोबर आहे ?

(A) (4), (1), (2), (3)

(B) (1), (2), (3), (4)

(C) (4), (2), (3), (1)

(D) (3), (2), (4), (1)

8. Match the following :

Concepts

(*a*) Cycle of erosion

(*b*) Antecedence of drainage

(*c*) Geosyncline

(*d*) Sea floor spreading

Scholars

(1) Maj. Powell

(2) W. M. Davis

(3) Hess

(4) Dana

Which of the following is the *correct* sequence of the pairs ?

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(2)	(1)	(4)	(3)
(C)	(3)	(2)	(1)	(4)
(D)	(4)	(3)	(2)	(1)

8. जोड्या लावा :

संकल्पना

(*a*) अपक्षरण चक्र

(*b*) जलवाहनाचे पूर्ववर्तीत्व

(*c*) भूद्रोणी

(*d*) सागरतल विस्तारण

अभ्यासक

(1) मेजर पॉवेल

(2) डब्लू. एम. डेव्हिस

(3) हेस

(4) दाना

खालीलपैकी जोड्यांचा कोणता अनुक्रम बरोबर आहे ?

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(2)	(1)	(4)	(3)
(C)	(3)	(2)	(1)	(4)
(D)	(4)	(3)	(2)	(1)

9. The variability of monsoon rain is highest over ..... .

(A) North East India

(B) Central India

(C) North West India

(D) Eastern India

10. **Assertion (A) :**

Ozone above about 30 km causes net decrease of surface temperature.

Reason (R) :

Ozone above about 30 km absorbs relatively more incoming shortwave radiation causing a net decrease of surface temperatures.

Select the *correct* answer from the codes given below :

Codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true and (R) is false

(D) (A) is false but (R) is true

9. मान्सून पर्जन्याची सर्वाधिक चलनशीलता ..... येथे आढळते.

(A) ईशान्य भारत

(B) मध्य भारत

(C) वायव्य भारत

(D) पूर्व भारत

10. **प्रतिपादन (A) :**

साधारणपणे 30 किमीच्या वर असणारा ओझोन पृष्ठीय तापमानात निव्वळ घट करण्यास कारणीभूत ठरतो.

कारण (R) :

साधारणपणे 30 किमीच्या वर असणारा ओझोन येणाऱ्या लघु लहरी प्रारणाचे सापेक्षपणे जास्त शोषन करतो परिणामी पृष्ठीय तापमानात घट होते.

संकेतांक :

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

11. Which of the following is *not* a difference between temperate and tropical cyclones ?

(A) Temperate cyclones are larger than tropical cyclones

(B) Temperate cyclones have asymmetric arrangement of isobars in comparison to circular in case of tropical cyclone

(C) Temperate cyclones form over continents and oceans while tropical cyclones form only over ocean

(D) The precipitation in temperate cyclone is in the form of snow while in tropical cyclones it is in the form of rain

11. खालीलपैकी कोणता समशीतोष्ण व उष्ण कटिबंधीय आवर्तातील फरक **नाही** ?

(A) समशीतोष्ण कटिबंधीय आवर्त हे उष्ण कटिबंधीय आवर्तांपेक्षा मोठे असतात

(B) उष्ण कटिबंधीय आवर्तातील समभार रेषांच्या वर्तुळाकार मांडणीच्या तुलनेत समशीतोष्ण कटिबंधीय आवर्तात ती असमान असते

(C) समशीतोष्ण कटिबंधीय आवर्त भूखंड व महासागरावर निर्माण होतात तर उष्ण कटिबंधीय आवर्त भूखंडावर निर्माण होतात

(D) समशीतोष्ण कटिबंधीय आवर्तात वर्षा ही हिमरूपात तर उष्ण कटिबंधीय आवर्तात पर्जन्य स्वरूपात होते

12. Which factor does *not* affect the distribution of insolation ?

(A) Angle of sun rays

(B) Length of the day

(C) Distance between the earth and sun

(D) Distribution of land and water

13. Which of the following factors does *not* control evaporation ?

(A) Moisture content of the air

(B) Temperature of the air

(C) Sublimation

(D) Movement of the air

12. येणाऱ्या सौर प्रारणाच्या वितरणावर कोणता घटक परिणाम करत **नाही** ?

(A) सूर्य किरणांचा कोन

(B) दिवसाची लांबी

(C) पृथ्वी व सूर्य यातील अंतर

(D) जमीन व पाणी यांचे वितरण

13. खालीलपैकी कोणता घटक बाष्पीभवन नियंत्रित करत **नाही** ?

(A) हवेतील आर्द्रतेचा अंश

(B) हवेचे तापमान

(C) संप्लवन

(D) हवेची हालचाल

14. The heat transferred directly by the rising and mixing of warmed air is termed as ..... .

(A) Sensible heat

(B) Latent heat

(C) Specific heat

(D) Temperature

15. As per the Koeppen's climatic classification the Savanna is represented by which of the following letters ?

(A) Bs

(B) Aw

(C) As

(D) Am

16. Which one of the following is *not* a cold current ?

(A) Peru current

(B) Kamchatka current

(C) Falkland current

(D) Brazil current

14. उंचावणाऱ्या व उबदार हवेच्या मिश्रणामुळे थेट स्थानांतरीत होणाऱ्या उष्णतेस ..... असे म्हणतात.

(A) संवेद्य उष्णता

(B) सुप्त उष्णता

(C) विशिष्ट उष्णता

(D) तापमान

15. खालीलपैकी कोणती अक्षरे कोपेनच्या हवामान वर्गीकरणानुसार 'सव्हाना' चे प्रतिनिधित्व करतात ?

(A) Bs

(B) Aw

(C) As

(D) Am

16. खालीलपैकी कोणते एक शीत प्रवाह **नाही** ?

(A) पेरू प्रवाह

(B) कामचत्का प्रवाह

(C) फाल्कलँड प्रवाह

(D) ब्राझील प्रवाह

17. Arrange the following in correct order from high moisture to low moisture region and choose the *correct* option ?

(I) Scrub Savanna

(II) Desert Savanna

(III) Woodland Savanna

(IV) Grassland Savanna

(A) (I), (II), (III), (IV)

(B) (III), (IV), (I), (II)

(C) (IV), (III), (II), (I)

(D) (II), (I), (III), (IV)

18. The height of ocean wave increases when they travel ..... .

(A) in deep sea

(B) in shallow sea

(C) during high tide time

(D) during low tide time

17. खालील प्रदेशाची उच्च आर्द्रता ते निम्न आर्द्रता प्रदेश अशी योग्य मांडणी करा व **योग्य** विकल्प निवडा :

(I) खुरटे रूक्षवन

(II) वाळवंटी रूक्षवन

(III) काष्ठभूमी रूक्षवन

(IV) तृणभूमी रूक्षवन

(A) (I), (II), (III), (IV)

(B) (III), (IV), (I), (II)

(C) (IV), (III), (II), (I)

(D) (II), (I), (III), (IV)

18. सागरी लाटांची उंची वाढत जाते जेव्हा त्या ..... प्रवास करतात.

(A) खोल समुद्रात

(B) उथळ समुद्रात

(C) भरतीच्या वेळी

(D) ओहोटीच्या वेळी

19. Change in species composition is referred to as :

(A) Species turnover

(B) Species substitution

(C) Species exchange

(D) Species changeover

20. Species richness tends to decrease with increasing altitude. Which of the following is an exception for this rule ?

(A) Higher-altitude areas tend to be younger, in evolutionary term

(B) Higher-altitude areas tend to occupy relatively small areas

(C) Productivity declines with altitude

(D) Higher-altitude habitats tend to be isolated from one another

19. प्रजाती संरचनेतील बदलास ..... असे संबोधले जाते.

(A) प्रजातीमधील उलाढाल

(B) प्रजातीमधील पर्याय

(C) प्रजातीमधील अदलाबदल

(D) प्रजातीमधील बदलाव

20. वाढत जाणाऱ्या उंचीनुसार प्रजातींमधील समृद्धी कमी होत जाते. या नियमास खालीलपैकी कोणता अपवाद ठरतो ?

(A) उत्क्रांतीच्या संदर्भाने उंच प्रदेशीय क्षेत्रे ही त्यामानाने तरुण असतात

(B) उंच प्रदेशीय क्षेत्र त्यामानाने कमी क्षेत्र व्यापतात

(C) उंचीनुसार उत्पादकता कमी होते

(D) उंच प्रदेशीय अधिवास एकमेकांपासून अलिप्त राहाण्याचा प्रयत्न करतात

21. ..... zone has depth below 6000 meters.

(A) Littoral

(B) Benthic

(C) Hadal

(D) Abyssal

22. Several species of mollusca are grouped into ..... community.

(A) Benthos

(B) Nekton

(C) Pleuston

(D) Neuston

23. In a species-area relationship :

(A) The number of species in an area of habitat increases as the area of that habitat increases

(B) The number of species in a sample increases as the area covered by that sample increases

(C) The type of species observed in a habitat alters as the area of habitat alters

(D) Species diversity increases linearly with island size

21. ..... या क्षेत्राची खोली 6000 मीटरच्या खाली असते.

(A) सागरतटीय

(B) नितलस्थ

(C) हडल

(D) अगाधी

22. अनेक मृदुकाय प्रजाती ..... या समुहात वर्ग केल्या जातात.

(A) बेंथॉस

(B) नेक्टॉन

(C) प्ल्युस्टॉन

(D) न्यूस्टॉन

23. प्रजाती-क्षेत्र संबंधात :

(A) अधिवासातील प्रजातींची संख्या ही त्या अधिवास क्षेत्रातील विस्ताराप्रमाणे वाढते

(B) नमुन्यातील प्रजातींची संख्या ही त्या नमुना क्षेत्रातील विस्ताराप्रमाणे वाढते

(C) अधिवासात आढळणारे प्रजातींचे प्रकार अधिवास क्षेत्रातील विस्ताराप्रमाणे बदलतात

(D) प्रजातीय विविधता बेटाच्या आकाराच्या संदर्भाने रेषीय प्रमाणात वाढते

24. The statement that the fundamental theory is only rejected when a new theory is put forward that is believed to be superior was advocated by :

(A) Karl Popper

(B) Kuhn

(C) James Hutton

(D) Harvey

25. Which of the following is *not* a correct match ?

(A) Environmentalism : O'Riordan

(B) Third space : Soja

(C) Agricultural origins and dispersal : Sayer

(D) Innovation diffusion as a spatial process : Hägerstrand

24. मूलभूत सिद्धांत प्रामुख्याने नाकारला जातो जेव्हा एक नवीन सिद्धांत मांडला जातो व तो सरस आहे असा विश्वास असतो, असे विधान ..... यांनी सुचविले.

(A) कार्ल पॉपर

(B) कुह्न

(C) जेम्स हट्टन

(D) हार्वे

25. खालीलपैकी कोणती जोडी योग्य **नाही** ?

(A) पर्यावरणवाद : ओ रिऑर्डन

(B) तिसरे अभिक्षेत्र : सोजा

(C) कृषी उगम व विखरण : सॉयर

(D) नाविन्यपूर्ण शोधाचा प्रसार ही एक अभिक्षेत्रीय प्रक्रिया : हॅगरस्ट्रॅन्ड

26. Who coined the term 'delta' for triangular deposition at the mouth of river ?

(A) Eratosthenis

(B) Herodotus

(C) Ptolemy

(D) Davis

27. Wolpert's works are on :

(A) Economic Man

(B) Satisfying Model

(C) Hazard Perception

(D) Mental Maps

28. The concept of geography as a chorological science of the individual case was not tenable because it built on the assumption of absolute space was advocated by :

(A) Hartshorne

(B) Haggett

(C) Harvey

(D) Taylor

26. नदीच्या मुखाशी होणाऱ्या त्रिकोणाकृती संचयनासाठी 'डेल्टा' ही संज्ञा सर्वप्रथम कोणी मांडली ?

(A) इरॅटोस्थेनिस

(B) हिरोडॉट्स

(C) टॉलेमी

(D) डेव्हीस

27. वोल्पर्टचे कार्य ..... यावर आहे.

(A) नफेखोर मानव

(B) समाधानतेचे प्रारूप

(C) आपत्ती जाणीव

(D) मानसिक नकाशे

28. भूगोल हे एक वैयक्तिक घटनेचे क्षेत्रीय विज्ञान आहे. ही संकल्पना समर्थनीय कारण नाही या विषयाची बांधणी निरपेक्ष अभिक्षेत्राच्या गृहितकावर झाली आहे, असे प्रतिपादन ..... यांनी केले.

(A) हार्टशॉर्न

(B) हॅगट

(C) हार्वे

(D) टेलर

29. Which one of the following books is *not* authored by Mackinder ?

(A) Great Britain-Essays in Regional Geography

(B) The Geographical Pivot of History

(C) Britain and British Seas

(D) Democratic Ideas and Reality

30. "No vestiage of Beginning and No prospects of an end." This was stated by ..... .

(A) James Hutton

(B) James Dana

(C) Charles Lewyll

(D) Griffith Taylor

29. खालीलपैकी कोणते पुस्तक मॅकन्डरने स्वत: लिहिलेले **नाही** ?

(A) ग्रेट ब्रिटन एसेज इन रिजनल जिऑग्रफी

(B) द जिऑग्रफिकल पिवोट ऑफ हिस्ट्री

(C) ब्रिटन व ब्रिटीश सीज

(D) डेमोक्रॅटिक आयडियाज ॲन्ड रिॲलिटी

30. ''सुखातीच्या परिस्थितीचा मागमूस नाही किंवा अंत्याची अपेक्षा नाही.'' हे विधान कोणी केले ?

(A) जेम्स हट्टन

(B) जेम्स दाना

(C) चार्लस लेविल

(D) ग्रिफीथ टेलर

31. A continuous belt of urban population progressively linking several cities is known as :

(A) Metropolis

(B) Technopolis

(C) Conurbation

(D) Ecumenopolis

32. The second largest metroplitan (as per 2011 census) is ..... .

(A) Kolkata

(B) Chennai

(C) Mumbai

(D) Delhi

31. नागरी लोकसंख्याचा सलग पट्टा जो प्रागति-करित्या विविध शहरांना जोडला जातो त्यास ..... असे म्हणतात.

(A) महानगर

(B) तंत्रनगर

(C) अतिमहापिशाळ नगर

(D) वैश्विक विस्तार असणारे काल्पनिक शहर

32. 2011 च्या जनगणनेनुसार दुसऱ्या क्रमाकांचे महानगर ..... आहे.

(A) कोलकता

(B) चेन्नई

(C) मुंबई

(D) दिल्ली

33. Match the following :

Name

(1) Nelson

(2) Duncan and Reiss

(3) Johnwebb and Maxwell

(4) Moser and Scott

Method/Technique

(*a*) Quartile

(*b*) Standard Deviation

(*c*) Multivariate

(*d*) Percentage and Mean

Which of the following is *correct* sequence ?

(1) (2) (3) (4)

(A) (*b*) (*a*) (*d*) (*c*)

(B) (*a*) (*b*) (*c*) (*d*)

(C) (*d*) (*c*) (*b*) (*a*)

(D) (*c*) (*d*) (*a*) (*b*)

33. योग्य जोड्या जुळवा :

नाव

(1) नेल्सन

(2) डंकन व रिस्

(3) जॉनवेब व मॅक्सवेल

(4) मोझर व स्कॉट

पद्धती/तंत्र

(*a*) चतुर्थक

(*b*) प्रमाणित विचलन

(*c*) बहुचलीय

(*d*) टक्केवारी व सरासरी

खालीलपैकी कोणता क्रम **योग्य** आहे ?

(1) (2) (3) (4)

(A) (*b*) (*a*) (*d*) (*c*)

(B) (*a*) (*b*) (*c*) (*d*)

(C) (*d*) (*c*) (*b*) (*a*)

(D) (*c*) (*d*) (*a*) (*b*)

34. Due to climate change, forced migration will be prominently seen amongst ..... group of farmers

(A) Small cultivators

(B) Marginalised agricultural labourers

(C) Large farm owners

(D) (A) and (B)

35. Which of the following will *not* be the salient feature of progressive population pyramid ?

(A) High fertility rate

(B) High proportion of population in children age group

(C) Second stage of demographic transition theory

(D) Disproportion of males to female

34. हवामान बदलामुळे, सक्तीचे स्थलांतर मुख्यत्त्वे ..... या शेतक-यांच्या समूहात घडेल.

(A) लहान शेतकरी

(B) दुर्बळ शेतमजूर

(C) मोठे शेतकरी

(D) (A) आणि (B)

35. खालीलपैकी कोणते 'प्रागतिक लोकसंख्यास्तूप' चे ठळक वैशिष्ट्ये **नाही** ?

(A) उच्च जननदर

(B) बालवयोगट लोकसंख्येचे उच्चप्रमाण

(C) लोकसंख्या संक्रमण सिद्धांताची दुसरी अवस्था

(D) पुरुषांचे स्त्रियांशी अयोग्यप्रमाण

36. In the context of population nexus resources, who popularised the concept of "optimum population" ?

(A) William Bunge

(B) Robbins, Carr-Saunders and Dalton

(C) Patrick Geddes

(D) Robert Malthus

37. Wet point rural settlements are commonly found ..... .

(A) Near the source of water supply

(B) In marshes and swamps

(C) In deserts

(D) At any place

36. लोकसंख्या साखळी संसाधन संदर्भातून 'पर्याप्त लोकसंख्या' या संकल्पनेचा कोणी पुरस्कार केला ?

(A) विल्यम बंग

(B) रॉबिन्स, कॉर-साँडर्स व डाल्टन

(C) पेट्रीक गेड्डीस

(D) रॉबर्ट मॉल्थस

37. आर्द्र स्थान ग्रामीण वस्त्या प्रामुख्याने ..... आढळतात.

(A) पाणी पुरवठा स्रोताजवळ

(B) दलदल व पाणथळ क्षेत्राजवळ

(C) वाळवंट क्षेत्रात

(D) कोणत्याही ठिकाणी

38. Which country adopted 4 : 2 : 1 formula in its population policy ?

(A) Brazil

(B) India

(C) China

(D) South Africa

39. Which of the following grassland regions of Argentina is known for commercial grazing activities ?

(A) Llanos

(B) Savannah

(C) Campos

(D) El Gran Chako

38. खालीलपैकी कोणत्या देशाने 4 : 2 : 1 हे सूत्र लोकसंख्या धोरण म्हणून अंगीकृत केले ?

(A) ब्राझिल

(B) भारत

(C) चीन

(D) दक्षिण आफ्रिका

39. अर्जेंटिनातील, खालीलपैकी कोणता गवताळ प्रदेश व्यापारी चराईक्रियांसाठी प्रसिद्ध आहे ?

(A) लानोस

(B) सॅव्हाना

(C) कॅम्पोस

(D) एल ग्रान चाको

40. Industry (List I) and their associated location (List II) are given below.

Match the List I with List II and choose the *correct* answer from the codes given below :

List I

(Industry)

(*a*) IISCO

(*b*) NALCO

(*c*) BALCO

(*d*) HSL

List II

(Location)

(*i*) Kobra

(*ii*) Burnpur

(*iii*) Koraput

(*iv*) Rourkela

Codes :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*i*)	(*ii*)	(*iv*)	(*iii*)
(B)	(*ii*)	(*iii*)	(*i*)	(*iv*)
(C)	(*iii*)	(*iv*)	(*ii*)	(*i*)
(D)	(*iv*)	(*i*)	(*iii*)	(*ii*)

40. उद्योग (सूची I) व त्यांच्याशी निगडित स्थान (सूची II) दिलेले आहेत.

सूची I व सूची II यांच्या जोड्या जुळवून खाली दिलेल्या संकेतांतून योग्य पर्याय निवडा :

सूची I

(उद्योग)

(*a*) IISCO

(*b*) NALCO

(*c*) BALCO

(*d*) HSL

सूची II

(स्थान)

(*i*) कोबरा

(*ii*) बर्नपूर

(*iii*) कोरपूट

(*iv*) राऊरकेला

संकेतांक :

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(*i*)	(*ii*)	(*iv*)	(*iii*)
(B)	(*ii*)	(*iii*)	(*i*)	(*iv*)
(C)	(*iii*)	(*iv*)	(*ii*)	(*i*)
(D)	(*iv*)	(*i*)	(*iii*)	(*ii*)

41. Nangal, Namrup, Gorakhpur and Neyveli are associated with location of ..... industry.

(A) Paper and Pulp

(B) Chemical Fertilizer

(C) Cotton Textile

(D) Copper

41. नांगल, नामरूप, गोरखपूर व नेवली हे ..... उद्योगाच्या संबंधित स्थानके आहेत.

(A) कागद व लगदा

(B) रासायनिक खते

(C) सुतीकापड

(D) तांबे

42. ..... is *not* included as fixed transport cost.

(A) Infrastructure cost

(B) Terminal cost

(C) Servicing and maintenance cost

(D) Administrative and managerial staff cost

42. ..... चा निश्चित वाहतूक खर्चात समावेश होत **नाही**.

(A) पायाभूत सुविधा खर्च

(B) स्थानक खर्च

(C) सेवा व देखरेख खर्च

(D) प्रशासकीय व व्यवस्थापकीय खर्च

43. ..... has the world's longest railway network.

(A) United States of America

(B) China

(C) Russia

(D) Germany

44. Which of the following is *not* an example of cultural region ?

(A) Agricultural region

(B) Linguistic region

(C) Pedological region

(D) Industrial region

45. ..... is the pioneer in using the empirical technique for the delimitation of agricultural regions.

(A) Baker

(B) Hartshorne

(C) Dicken

(D) Joe

43. ..... येथे जगातील सर्वात लांब रेल्वे जाळे आहे.

(A) संयुक्त राज्य अमेरिका

(B) चीन

(C) रशिया

(D) जर्मनी

44. खालीलपैकी कोणते उदाहरण सांस्कृतिक प्रदेशाचे **नाही** ?

(A) शेती प्रदेश

(B) भाषिक प्रदेश

(C) मृदा प्रदेश

(D) औद्योगिक प्रदेश

45. शेती विभाग मर्यादा निश्चितीसाठी प्रायोगिक तंत्राचा वापर सर्वप्रथम ..... यांनी केला.

(A) बेकर

(B) हार्टशॉर्न

(C) डिकन

(D) ज्यो

46. As per Aristotle's model of ideal state, the strength of state lies in :

(A) Nature of territory

(B) Territory and ruler

(C) Size of population

(D) Nature of territory and size of population

47. Identify the *incorrect* match :

(A) Meenas : Rajasthan

(B) Santhals : Jharkhand

(C) Bodos : West Bengal

(D) Adis : Arunachal Pradesh

48. Who is known for his studies of house types in India ?

(A) A. B. Mukerji

(B) A. Ahmad

(C) G. S. Gosal

(D) R. L. Singh

46. ॲरिस्टाटलच्या आदर्श राज्य प्रतिमानानुसार, राज्यांची बलस्थाने ..... येथे आढळतात.

(A) भूप्रदेशाचे स्वरूप

(B) भूप्रदेश आणि शास्ता

(C) लोकसंख्येचे आकारमान

(D) भूप्रदेशाचे स्वरूप आणि लोकसंख्येचे आकारमान

47. **चुकीची** जोडी ओळखा :

(A) मीणा : राजस्थान

(B) संथाल : झारखंड

(C) बोडो : पश्चिम बंगाल

(D) आदी : अरुणाचल प्रदेश

48. खालीलपैकी कोण, भारतातील गृह प्रकारांचा अभ्यासक म्हणून ओळखला जातो :

(A) ए. बी. मुखर्जी

(B) ए. अहमद

(C) जी. एस. घोषाल

(D) आर. एल. सिंग

49. Find the odd pilgrimage centre out of the following :

(A) Deoghar

(B) Kashi/Varanasi

(C) Pushkar

(D) Ujjain

50. Which religion is not included in the oriental cultural realm ?

(A) Hinduism

(B) Confucianism

(C) Taoism

(D) Buddhism

51. Kibbutz, a communal form of land tenure is ..... .

(A) Chinese

(B) Israeli

(C) Polish

(D) Hungarian

49. खालील यात्रास्थळांपैकी वेगळे स्थळ कोणते ते शोधा :

(A) देवघर

(B) काशी/वाराणसी

(C) पुष्कर

(D) उज्जैन

50. पौर्वात्य सांस्कृतिक गटात खालीलपैकी कशाचा समावेश होत **नाही** ?

(A) हिंदूवाद

(B) कन्फ्युशिअनवाद

(C) टोईवाद

(D) बौद्धवाद

51. किबुट्झ हा ..... मधील सामूहिक जमीन धारणेचा प्रकार आहे.

(A) चीन

(B) इस्राईल

(C) पोलंड

(D) हंगेरी

52. As per Sauer's model, cultural landscape is created through which of the following ?

(A) Culture, Climate and Time

(B) Climate, Natural Landscape and Time

(C) Culture, Natural Landscape and Time

(D) Climate, Cultural and Natural Landscape

53. 'Diaspora' has been initially used to refer the dispersal of ..... .

(A) Buddhists

(B) Christians

(C) Jews

(D) Muslims

52. सॉयरच्या प्रारूपानुसार, सांस्कृतिक भूदृश्याची निर्मिती खालीलपैकी कोणाद्वारे होते ?

(A) संस्कृती, हवामान व काळ

(B) हवामान, नैसर्गिक भूदृश्य व काळ

(C) संस्कृती, नैसर्गिक भूदृश्य व काळ

(D) हवामान, सांस्कृतिक व नैसर्गिक भूदृश्य

53. डायस्पोराचा सर्वप्रथम उल्लेख ..... च्या विखरण्या संदर्भात केला गेला.

(A) बुद्धीस्ट

(B) ख्रिश्चन

(C) ज्यू

(D) मुस्लीम

54. Arrange the following watershed units from lower order to higher order :

(1) The river basin

(2) Tributary basin

(3) Sub-basin of a stream

(4) Watershed of a stream of lower order

(A) (4), (3), (2), (1)

(B) (4), (3), (1), (2)

(C) (1), (2), (3), (4)

(D) (1), (3), (2), (4)

55. ..... criteria cannot be a common characteristic of homogeneity across different regions.

(A) Economic activity

(B) Culture

(C) Soil

(D) Political unit

54. खालील पाणलोट क्षेत्र एकक निम्नपासून उच्चक्रमाकडे आयोजित करा :

(1) नदी खोरे

(2) उपनदी खोरे

(3) प्रवाहाचे उपखोरे

(4) कमी श्रेणी प्रवाह पाणलोट क्षेत्र

(A) (4), (3), (2), (1)

(B) (4), (3), (1), (2)

(C) (1), (2), (3), (4)

(D) (1), (3), (2), (4)

55. ..... हा निकष विविध प्रदेशातीत एकजिनसीततामध्ये सर्वसाधारण गुणवैशिष्ट्ये नसतो.

(A) आर्थिक क्रिया

(B) संस्कृती

(C) मृदा

(D) राजकीय एकक

56. ..... represents the last stage of planning, according to Glasson.

(A) Provision of a continuous evaluation of the implementation programme

(B) Projection of the future situation

(C) Production of a preferred plan with policy statement

(D) Formulation of general goals and specific measurable objective relating to the problem

57. Statements :

(1) Budget is an allocative planning.

(2) Integrated watershed development is a multiple level planning.

Which of the statements given above is/are *correct* ?

(A) Only (1)

(B) Only (2)

(C) Both (1) and (2)

(D) Neither (1) nor (2)

56. ग्लॉसन यांच्या म्हणण्यानुसार ..... हा नियोजनाचा शेवटचा टप्पा दर्शवितो.

(A) अंमलबजावणी केलेल्या योजनेचे सातत्याने मूल्यमापन करण्याची अट

(B) भविष्यकालीन परिस्थितीचे अंदाज वर्तविणे

(C) धोरणात्मक विधानांसह पसंतीचा आराखडा तयार ठेवणे

(D) समस्येच्या अनुषंगाने विशिष्ट मापनीय हेतू व सर्वसाधारण उद्दीष्टांची मांडणी करणे

57. विधाने :

(1) अंदाजपत्रक हे वाटपीय नियोजन आहे.

(2) एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास हे बहुपातळीय नियोजन आहे.

खालीलपैकी कोणते विधान/विधाने **योग्य** आहेत ?

(A) फक्त (1)

(B) फक्त (2)

(C) (1) व (2) दोन्ही

(D) (1) व (2) पैकी कोणतेच नाही

58. Which of the following is *not* included in the list of "smart city" in the Maharashtra, declared by Government of India as on Oct. 2016 ?

(A) Pune

(B) Nasik

(C) Solapur

(D) Kolhapur

59. "Twenty Point Programme" was launched in the year ..... .

(A) 1969

(B) 1975

(C) 1977

(D) 1980

58. ऑक्टोबर 2016 पर्यंत शासनाच्या जाहिर केलेल्या महाराष्ट्रातील 'स्मार्ट सिटी' च्या यादीमध्ये खालीलपैकी कोणत्या शहराचा समावेश **नाही** ?

(A) पुणे

(B) नाशिक

(C) सोलापूर

(D) कोल्हापूर

59. 'वीस कलमी योजना' ..... यावर्षी सुरू झाली होती.

(A) 1969

(B) 1975

(C) 1977

(D) 1980

60. Which Five Year Plan focused on "Growth with social justice and equity" ?

(A) Ninth Five Year Plan

(B) Eighth Five Year Plan

(C) Seventh Five Year Plan

(D) Sixth Five Year Plan

61. Agricultural region is a ..... .

(A) Homogeneous

(B) Natural

(C) Functional

(D) Nodal

62. Which of the following cities has the highest population growth rate during 2001-2011 ?

(A) Mumbai

(B) Bangluru

(C) Pune

(D) Delhi

60. कोणती पंचवार्षिक योजना 'सामाजिक न्याय व समानतेवर आधारित वाढ' यावर केंद्रित होती ?

(A) 9वी पंचवार्षिक योजना

(B) 8वी पंचवार्षिक योजना

(C) 7वी पंचवार्षिक योजना

(D) 6वी पंचवार्षिक योजना

61. कृषी प्रदेश ..... आहे.

(A) एकजिनसी

(B) नैसर्गिक

(C) कार्यात्मक

(D) केंद्रीय

62. 2001 ते 2011 दरम्यान खालीलपैकी कोणत्या शहराचा लोकसंख्या वृद्धी दर सर्वाधिक होता ?

(A) मुंबई

(B) बेंगलुरू

(C) पुणे

(D) दिल्ली

63. Which of the following regions in India is *not* covered by wet evergreen forest ?

(A) Terai Region of Eastern Himalaya

(B) Western Slope of Western Ghats

(C) Islands of Andaman and Nicobar

(D) Northern Slope of Eastern Ghats

64. ..... projects aiming development of the economy of small and marginal farmers in India.

(A) Eradication of Poverty

(B) SFDA and MFAL

(C) Eradication of Caste System

(D) Twenty Point Programme

63. खालीलपैकी भारतातील कोणत्या प्रदेशात आर्द्र सदाहरित वने आढळत **नाही** ?

(A) पूर्व हिमालयाचा तराई प्रदेश

(B) पश्चिम घाटचा पश्चिमेकडील उतारावर

(C) अंदमान व निकोबार बेटे

(D) पूर्व घाटचा उत्तरेकडील उतारावर

64. भारतातील सिमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक विकास उद्दीष्टांसाठी ..... हे प्रमुख प्रकल्प आहेत.

(A) दारिद्र्य निर्मूलन

(B) SFDA आणि MFAL

(C) जातीयता निर्मूलन

(D) वीस कलमी कार्यक्रम

65. Which of the following states is having least GDP growth as per 2011 census ?

(A) Bihar

(B) Maharashtra

(C) West Bengal

(D) Tamil Nadu

66. Which three rivers are considered to have been captured streams ?

(A) Girna, Panjra, Bori

(B) Manjara, Dudhana, Girna

(C) Manjara, Girna, Seena

(D) Girna, Dudhana, Bori

67. Which year is called a 'Great Divide' in the demographic history of India ?

(A) 1901

(B) 1921

(C) 1941

(D) 1951

65. 2011 जणगणनेनुसार खालीलपैकी कोणत्या राज्याची GDP वृद्धी कमी आहे ?

(A) बिहार

(B) महाराष्ट्र

(C) पश्चिम बंगाल

(D) तमिळनाडू

66. खालीलपैकी कोणत्या तीन नद्यांचे चौर्य झाले आहे असे मानले जाते ?

(A) गिरणा, पांजरा, बोरी

(B) मांजरा, दुधना, गिरणा

(C) मांजरा, गिरणा, सीना

(D) गिरणा, दुधना, बोरी

67. भारताच्या लोकसांख्यकीय इतिहासात कोणत्या वर्षास प्रमुख विभाजक समजतात ?

(A) 1901

(B) 1921

(C) 1941

(D) 1951

68. **Assertion (A) :**

The eastern coast of India is affected by the tropical cyclones more than the western Coast.

Reason (R) :

Bay of Bengal is under the influence of easterlies in later period of the year.

Select the *correct* answer from the codes given below :

Codes :

(A) Both (A) and (R) true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

68. **प्रतिपादन (A) :**

भारताच्या पूर्व किनारपट्टीवर उष्ण कटिबंधीय चक्रीवादळाचा पश्चिम किनारपट्टीपेक्षा जास्त परिणाम होतो.

कारण (R) :

बंगालच्या उपसागराचा भाग पूर्वीय वाऱ्यांच्या प्रभावाखाली असतो.

खालील सांकेतांकापैकी योग्य विकल्प निवडा :

संकेतांक :

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

69. Which of the following statements is not right with reference to geocentric satellite ?

(A) These are placed around 36,000 km

(B) They continuously observe one and the same area

(C) These are polar orbiting satellites

(D) They are stationary but not static

70. The panchromatic sensors in IRS-1C and 1D satellites has a ground resolution of ..... meters.

(A) 5

(B) 2.5

(C) 23

(D) 32

69. भूकेंद्रीय उपग्रहासंदर्भात खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?

(A) हे सुमारे 36,000 कि.मी. अंतरावर स्थापित असतात

(B) ते सातत्याने पृथ्वीवरील एकाच भागाचे निरीक्षण करतात

(C) ते ध्रुवीय कक्षेतील उपग्रह आहेत

(D) हे स्थिर आहेत पण अचल नाहीत

70. आय. आर. एस.—1C आणि 1D या उपग्रहांच्या अखिल रंग संवेदकाचे क्षेत्रीय विभेदन ..... मीटर आहे.

(A) 5

(B) 2.5

(C) 23

(D) 32

71. Relative relief means ..... .

(A) Difference between elevations at two adjacent places

(B) Elevation with reference to the mean sea level

(C) The distance between the top and bottom of the features

(D) The level with respect to benchmark

72. Whatever be the value of observed score the mean of their deviation scores will always be equal to ..... .

(A) Less than zero

(B) More than zero

(C) Equal to observed mean

(D) Zero

71. सापेक्ष उठाव म्हणजे ..... .

(A) सलग दोन ठिकाणातील उंचीतील फरक

(B) सरासरी समुद्र सपाटीच्या संदर्भाने उंची

(C) भूरूपाची उच्च आणि तळाच्या पातळीतील अंतर

(D) बेंचमार्कच्या संदर्भाने असलेली पातळी

72. निरीक्षण अंकाचे कोणतेही मूल्य असले तरी त्यांच्या विचलन मूल्यांची सरासरी नेहमी ..... असते.

(A) शून्यापेक्षा कमी

(B) शून्यापेक्षा जास्त

(C) निरीक्षण मूल्यांच्या सरासरी इतकी

(D) शून्य

73. Match the following :

Information Collected

(*a*) Mother tongue of people

(*b*) Ranks of students

(*c*) Salary difference of employees

(*d*) Density of population

Levels of Measurement

(1) Ratio

(2) Nominal

(3) Ordinal

(4) Interval

Which one of the following is the *correct* sequence of the pairs ?

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(2)	(3)	(4)	(1)
(C)	(1)	(3)	(4)	(2)
(D)	(4)	(2)	(3)	(1)

73. जोड्या लावा :

संकलित माहिती

(*a*) लोकांची मातृभाषा

(*b*) विद्यार्थ्यांची श्रेणी

(*c*) नोकरदारांच्या वेतनातील फरक

(*d*) लोकसंख्या घनता

माहिती स्तर

(1) गुणोत्तर

(2) नाममात्र

(3) श्रेणीय

(4) फरकात्मक

खालीलपैकी जोड्यांचा कोणता अनुक्रम **बरोबर** आहे ?

	(*a*)	(*b*)	(*c*)	(*d*)
(A)	(1)	(2)	(3)	(4)
(B)	(2)	(3)	(4)	(1)
(C)	(1)	(3)	(4)	(2)
(D)	(4)	(2)	(3)	(1)

74. A map showing the parcels of land with their sequential numbers is an example of ..... .

(A) Thematic map

(B) Political map

(C) Topographic map

(D) Cardastral map

75. Which of the following scales does *not* use units of measurement ?

(A) Graphical scale

(B) R. F.

(C) Verbal scale

(D) Time scale

74. जमिनीचे तुकडे त्यांच्या अनुक्रम क्रमांकासह दाखविणारा नकाशा हे ..... प्रकारचा नकाशा होय.

(A) उद्देशीय नकाशे

(B) राजकीय नकाशे

(C) स्थलदर्शक नकाशे

(D) मालकीहक्क नकाशे

75. खालीलपैकी कोणत्या नकाशा प्रमाणात मापन एककाचा वापर केला जात **नाही** ?

(A) आलेखीयप्रमाण

(B) R. F. प्रातिनिधिक अपूर्णांक

(C) शब्दप्रमाण

(D) कालप्रमाण

ROUGH WORK

ROUGH WORK